# महात्मा गांधीजी यांचे राजकीय विचार- एक चिंतन

**प्रा. बैनवाड स्वाती प्रकाशराव**, (राज्यशास्त्र विभाग) रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद.

---

**प्रस्तावना:-**

आधुनिक भारतीय राजकीय विचारवंतात महात्मा गांधीजींचे स्थान महत्त्वाचे आहे. महात्मा गांधीजी हे एक अध्यात्मवादी व आदर्शवादी राजकीय विचारवंत आहेत. ते मानवतावादी होते त्यांनी राजकारणाला नैतिक अधिष्ठान दिले टिळक युगाचा अस्त झाल्यानंतर गांधी युगाचा प्रारंभ होतो .भारतीय स्वातंत्र्य लढ्याला त्यांनी प्रथमतः सामान्याची चळवळ बनवले.

गांधीजींच्या राजकीय तत्त्वज्ञानाला गांधीवाद म्हणून संबोधले जाते. गांधीजींनी आपले राजकीय तत्त्वज्ञान हरिजन व यंग इंडिया या वर्तमानपत्रातून व्यक्त केले होते .त्यांनी कर्म व चिंतन यांचा समन्वय साधला होता. गांधीवाद हा सिद्धांत नाही तर ती एक जीवनप्रणाली आहे. गांधीजीवर भगवद्गगीतेचा विशेष प्रभाव होता.त्यांच्यावर जॉन रस्किनचा देखील प्रभाव होता. जैन व बौद्ध धर्माचा प्रभाव होता. शेवटच्या व्यक्तीपर्यंत विकास पोहोचवणे हे त्यांचे ध्येय होते जनतेच्या इच्छेकडे दुर्लक्ष करून राज्यकर्ते जर राज्यकारभार करत असतील तर त्याचा परिणाम राज्यकर्त्यांना भोगावे लागतात हे त्यांचे विचार आजच्या राजकारणानाला देखील लागू होतो. प्लेटो किंवा अरिस्टॉटल सारख्या राजकीय विचारवंतांपेक्षा वेगळे नाहीत परंतु आज गांधीजी वर मोठ्या प्रमाणावर टीका केली जाते ज्यांनी कधी गांधी वाचले पण नाहीत ते देखील गांधीजी वर टीका करताना दिसतात तेव्हा आईन्स्टाईनचे वाक्य आठवल्याशिवाय राहत नाही "हाडामासाचा हा महामानव आमच्यात होता यावर पुढील पिढ्यांचा विश्वास बसणार नाही"त्याचबरोबर ना. गोखले यांनी म्हटले होते की जी माणसे गांधीजींच्या प्रत्यक्ष सहवासात येतात त्यांनाच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची थोरवी कळून येते.

शोध निबंधात महात्मा गांधीजींच्या राजकीय विचारांबाबत सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

अ) महात्मा गांधीजींचे राजकीय विचार कोणते हे जाणून घेणे .

ब) गांधीजींच्या राजकीय विचारांचा आजच्या काळातील संदर्भ शोधणे.

**संशोधन पद्धती:-**

सदर शोध निबंध तयार करण्याकरिता दुय्यम साधनसामुग्रीचा वापर करण्यात आला आहे ज्यात वृत्तपत्रे संदर्भ ग्रंथ आंतरजालचा वापर करण्यात आला आहे.

**महात्मा गांधीजींचे राजकीय विचार:-**

महात्मा गांधीजींनी प्रमाणबद्ध असे राजकीय विचार मांडले नाहीत पण त्यांनी वृत्तपत्रात लिहिलेले लेख पुस्तके व त्यांनी वेळोवेळी केलेली भाषणे यातून ते विचार आलेली दिसून येतात

गांधीजी एक तत्त्वज्ञानी होते .त्यांचे विचार सत्य अहिसा,सत्याग्रह, रामराज्य ,सर्वोदय यातून पाहायला मिळतात सत्यबाबत गांधीजी फार आग्रही असल्याचे दिसून येते त्यांच्या आत्मकथनाचे नावच त्यांनी "माझे सत्याचे प्रयोग" असे दिले आहे सत्याची पाठ राखण करण्यासाठी विष प्राशन करावे लागते हे सांगण्यासाठी ते सॉक्रेटिस चे उदाहरण देतात. सत्याचे दोन प्रकार सांगतात सापेक्ष सत्य व निरपेक्ष सत्य. सापेक्ष सत्य हे सत्य परिस्थिती सापेक्ष असते म्हणजे जे सत्य परिस्थितीनुसार बदलते त्यामुळे त्याला पूर्ण सत्य म्हणता येणार नाही ते काळ परिस्थितीनुसार बदलत असते निरपेक्ष सत्य हे शाश्वत व चिरंत नाही जे कोणत्याही काल परिस्थितीनुसार बदलतात शाश्वत व चिरंतन असते.

गांधीजींच्या विचारातील पुढील संदर्भ हा अहिंसेच आहे .गांधीजींवर बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडलेला होता सत्य आणि अहिंसा परस्परावलंबी आहेत .अहिंसेच्या मार्गाने सत्याप्रत जाता येते कोणत्याही प्राणी मात्राला शब्द विचार आचरण यातून दुःख होऊ न देणे हा अहिंसेत अभिप्रेत आहे गांधीजींनी अहिंसेचे प्रकार सांगितले आहेत ज्यात निषेधात्मक अहिंसा, विधायक अहिंसा व निरपेक्ष अहिंसा हे प्रकार आहेत अहिंसेची संकल्पना सकारात्मक आहे. हिंसा करणाऱ्या व्यक्तीच्या मनात वृत्तीत बदल घडवून आणणे हा अहिंसेचा खरा अर्थ आहे .अहिंसेचा लढा लढणारा नैतिक असावा अहिंसा म्हणजे अन्याय होत असताना शांत राहणे हा अर्थ त्यांना अभिप्रेत नव्हता कारण अन्याय करणाऱ्या पेक्षा अन्याय सहन करणारा जास्त दोषी आहे.

गांधीजींनी सत्याग्रहाचा मार्ग सांगितला. गांधीजी साधन सूचीतेला प्रचंड महत्व देतात साध्य जेवढे उच्च असेल ते मिळवण्याचे साधने तितकेच उच्च असावे सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह असे म्हणतात सत्याग्रहात अहिंसेला महत्त्व आहे सत्याग्रह हे वीर पुरुषाचे कार्य आहे सत्याग्रह करताना गृहीचा मृत्यू जरी झाला तर तो देखील त्याचा विजय ठरतो हे सांगताना ती येशूचे उदाहरण देतात सत्याग्रह कोणी करावा याचेही विश्लेषण गांधीजींनी सांगितले आहे त्यांनी सत्याग्रहाचे मार्ग सांगितले जात असहकार ,सविनय कायदेभंग ,हरताळ ,उपोषण, बहिष्कार ,हिजरत व निरोधन .हे साधने वापरताना त्यांचा वापर वारंवार करू नये असे देखील ते सांगतात कारण ही साधने वारंवार वापरली तर त्याचे महत्त्व कमी होते. सत्याग्रही व्यक्तीने द्वेष किंवा आकसाने सत्याग्रह करू नये ज्याच्या विरोधात सत्याग्रह करणार आहे त्याच्याबद्दल आदर असावा.

गांधीजींच्या राजकीय विचारातील पुढचा विचार म्हणजे स्वराज्य हा होय .गांधीजी म्हणतात की,ब्रिटिश भारतातून गेल्याशिवाय भारताचा विकास होऊ शकत नाही असे मत त्यांनी मांडले व त्यांना घालवण्यासाठी कोणतेही किंमत मोजावी लागली तरी चालेल ,स्वराज्याचा गांधीजींना अभिप्रेत अर्थ म्हणजे लोकांच्या आtमान्यतेने चालणारे शासन होय .प्राथमिक शासनाला त्यांनी मान्यता दिली पण काही काळापुरतेच असल्याचे दिसते स्वराज्य हे केवळ श्रेष्ठजनंपुरतेच मर्यादित असून चालणार नाही ते सर्वांसाठी असेल जेवढे ते श्रीमंताचे असेल तेवढेसे गरीबांचे देखील असेल जेवढे ते हिंदूचे असेल तेवढेच ते मुस्लिम, जैन ,पारशी ,ख्रिश्चन ,शीख यांच्यासाठी असेल स्वराज्य हे सामाजिक व राजकीय समतेवर आधारलेले असेल गांधीजींची स्वराज्य कल्पना चौरसाकृती होती चौरसाच्या एका कोणावर राजकीय स्वातंत्र्य दुसऱ्यावर आर्थिक स्वातंत्र्य तिसऱ्या कोणावर नैतिक सामाजिक स्वातंत्र्य तर चौथा कोणावर धार्मिक स्वातंत्र्य असेल . त्यांनी आपल्या स्वराज्यात सांगितले आहे स्वराज्यामध्ये त्यांनी आपली रामराज्याची संकल्पना मांडली आहे ते आदर्श राज्य पाहिजे ग्रामस्वराज्य त्यांनी विकेंद्रीकरणाच्या तत्वाला प्राधान्य दिले खेड्याकडे चला म्हणजेच खेडे स्वयंपूर्ण झाली पाहिजेत त्यासाठी ते ग्राम उद्योग व कुटूर उद्योगाचे समर्थन करताना दिसून येतात.

गांधीजींच्या मते संपूर्ण समाज अहिंसामय झाला की शासनाची गरज राहणार नाही देशातील प्रत्येक खेडे जेव्हा स्वयंपूर्ण होतील अशावेळी राज्याची आवश्यकताच उरत नाही असे ते म्हणतात.

गांधीजींच्या विचारसरणीतील महत्त्वपूर्ण गाभा म्हणजे सर्वोदय आहे. जैन मुनि आचार्य सामंत भद्र यांच्या लेखनातून त्यांनी सर्वोदय हा शब्द प्रथम उचलला त्यांच्यावर जॉन रस्किनच्या अँड टू दिस लास्ट या पुस्तकाचा मोठा प्रभाव होता हा प्रसाद शेवटच्या व्यक्तीपर्यंत घेऊन जा असा संदेशात आहे की ज्याचा आशय समाजातील शेवटचा उपेक्षित घटक आहे त्याचा विकास व्हावा असा आहे त्याचबरोबर अधिकतम लोकांचे अधिकतम सुख हा उपयुक्तता वादाचा गाभा देखील त्यांच्या विचारात दिसून येतो

**निष्कर्ष:-**

गांधीजी हे काही राजकीय तत्त्वज्ञ नाहीत व त्यांचे जीवनच एक तत्त्वज्ञान आहे असे म्हणावे लागेल त्यांच्या विचारात प्रामुख्याने राज्यविरहित व पक्षविरहित लोकशाही विकेंद्रीकरण बोलण्याचे स्वातंत्र्य सर्वोदय सत्याग्रह स्वराज्य अस्पृश्यांना समान न्याय नैतिक राजकारण धर्मनिरपेक्षता इत्यादी दिसून येते आजच्या काळात त्यांच्या विचारांची नेतांत गरज असल्याचे जाणवते जिथे राजकारणांनी टोकाचा स्तर घडला आहे गांधीजी एक असे विचारवंत आहे जे कर्मावर विश्वास ठेवतात ज्यामध्ये स्वतःपासून ते त्याचा स्वीकार करतात गांधीजी हृदय परिवर्तनावर भर देतात कारण क्षमा करणे व त्यातून पुढच्या च्यामानसिक बदल होणे व त्याच्यात अहिंसेचा संचार होणे आवश्यक आहे गांधीजी राज्याला अनावश्यक व नैसर्गिक आहे असे मानतात.

**संदर्भ ग्रंथ सूची:-**

१. डॉ.कळंबे डी. एस ."भारतीय राजकीय विचारवंत "कैलास पब्लिकेशन औरंगाबाद ,प्रथम आवृत्ती 2006.

२. डॉ.भोळे भास्कर लक्ष्मण "आधुनिक भारतातील राजकीय विचार "पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स नागपूर, तिसरी आवृत्ती ,जानेवारी 2006

३. गांधी मोहनदास करमचंद ,संक्षिप्तकार कुमारप्पा भारतन "संक्षिप्त आत्मकथा", नवजीवन प्रकाशन ,मंदिर, अहमदाबाद, दहावी आवृत्ती जून 2016.

४. प्रा.डॉ. नांदेडकर व. गो." राजकीय विचार आणि विचारवंत" डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती जानेवारी 2011.